# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २६.०५.२०२६ मंगळवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २३.०५.२०२६ चे ०७.०० वा. ते दि. २५.०५.२०२६ चे २०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, प्लॉट नं. १००, मुरलीधर सोसायटी, बी.एस.एन.एल. ऑफीस मागे, पांजरा, कोराडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी प्रशांत माणिकराव गवळी, वय ४६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह साळ्याचे लग्नाकरीता भुसावळ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २५,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,५८,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. बावणे ९७६४८७०८०३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे खापरखेडा:— विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २४.०५.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत राहणाऱ्या फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीचा परिचीत आरोपी नामे आशिष महेश बहेकर, वय २५ वर्षे, रा. श्रीनगर, तह. कामठी, जि. नागपूर याने मागील दोन महिन्यांपासून पीडीत मुलीचे मोबाईलवर अश्लिल व लज्जा उत्पन्न होईल असे संदेश पाठविले. नमुद संदेश पिडीतेच्या वडीलांनी बघितले. तेव्हा त्यांनी आरोपीस समजाविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने पिडीतेला पळवून नेण्याची धमकी दिली. आरोपीने पिडीता अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. आशिष कोहळे ९९२३४५३५५२ यांनी आरोपीविरूध्द कलम ७५,७९,३५१(२) भा.न्या.सं., सहकलम १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कळमणा :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०५.२०२६ चे २२.३० वा. ते २२.४० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे नातेवाईक नामे विलास जगदीश वासनिक, वय ४३ वर्षे, रा. लुंबिनी नगर, बेझनबाग, जरीपटका, नागपूर हे त्यांची हिरो पॅशन दुचाकी क्र. एमएच ४९ एएच ८०२१ ने पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, चिखली चौक समोरील उडाणपुलावरुन जात असतांना, ट्रक क्र. एमएच ४० सीडी ४६५२ चा चालक आरोपी नामे रामभरोसे शंकरलाल मोरी, वय ४५ वर्षे, रा. लोहारधा, जि. देवास (मध्य प्रदेश) याने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व

धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे नातेवाईकाचे मोटार सायकलला धडक मारल्याने, दुचाकी चालक खाली पडुन गंभीर जखमी झाले. जखमी यांचा उपचार मेयो हॉस्पीटल येथे करण्यात आला आहे.

यांप्रकरणी दिनांक २५.०५.२६ रोजी चे १५.०० वा. फिर्यादी गुलशन सिंध्दात मेश्राम, वय ४१ वर्षे, रा. लुंबिनी नगर, बेझनबाग, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. हनुमंत इंगळे ९६७३९२१७१७ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे नवीन कामठी</u> :—** दिनांक २६.०५.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे अरशद कमाल वल्द मोहम्मद साबीर, वय ५६ वर्षे, रा. नवा बाजार, ईमलीबाग, कामठी, जि. नागपूर हे पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, आदर्श नगर, आमघरे यांचे घराचे बाजुला असलेल्या झाडावर चढून बकरी करीता चारा तोडीत असताना त्यांना इलेक्ट्रीक करंट चा झटका लागल्याने ते झाडावरुन खाली पडले. त्यांचे डोक्याला व हाताला मार लागून ते गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे नेले असता, उपचारादरम्यान, १३.३५ वा. चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी इरफान मलीक वल्द अरशद कमाल, वय २१ वर्षे, रा. नवा बाजार, ईमलीबाग, कामठी, जि. नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे मपोउपनि. मनिषा जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे गणेशपेठ</u> :—** दिनांक २५.०५.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, गणेशपेठ पोलीसांचे बिट मार्शल यांना पोलीस नियंत्रण कक्षाद्वारे माहिती प्राप्त झाल्याने, ते पोलीस ठाणे हद्दीत बैद्यनाथ चौक येथे गेले असता, त्यांना तेथे रोडचे कडेला फुटपाथवर एक अनोळखी पुरुष ईसम वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी सरतर्फे फिर्यादी गणेश पिंगळे यांनी दिलेल्या सुचनेवरून, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. विक्रम सोनवणे ९०२२१६८९६३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** श्रीमती बेबी परमानंद भगत, वय ५९ वर्षे, रा. प्लॉट नं. १०२, हुडकेश्वर खुर्द, नागपूर ह्या दिनांक ०१.०५.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— पांढरे बॉयकट, डोळे—काळे, अंगात— निळ्या रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे तहसिल</u> :—** मनोज पुंजारामजी गजभिये, वय ३२ वर्षे, रा. ११४, ईसापुर, तह. काटोल, जि. नागपूर हे दिनांक २२.०५.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील मेयो हॉस्पीटल येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ४ इंच, केस— काळे, डोळे—काळे, अंगात— काळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी व हिंदी बोलतात.



श्रीमती बेबी



मनोज

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१९८८/ २०१५ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | अक्षय चिंतामण सनेश्वर, रा. बाळु इंगळे चे घराजवळ, सुदाम नगरी, हिलटॉप, अंबाझरी, नागपुर. | ११.०६.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**